# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/५९
Telephone : 020-25621156/57/59
ईमेल/ Email : approval@unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
वेबसाइट/ Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. १०३ /२०२३

विषय : विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील अध्यापकांना मान्यता देताना तात्पुरती मान्यता (Provisional Approval) व अंतिम मान्यता (Final Approval) या पध्दतीचा अवलंब करून देण्यात यावयाच्या मान्यतेबाबत संगणकीकृत प्रक्रियेची संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य / संचालक / प्रबंधक / कार्यालयीन अधिक्षक / मुख्य लिपिक किंवा संबंधित पाहणारा सेवक इत्यादींपैकी दोन प्रतिनिधींना माहिती व मार्गदर्शन करण्यासाठी ऑनलाईन आयोजित करण्यात येणाऱ्या सभेबाबत...

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / परिसंस्था यांचेकडून दरवर्षी कायम / तदर्थ (Ad-hoc)/ तासिका तत्त्वावर, नेमणूक करण्यात येणाऱ्या अध्यापकांना मान्यता देण्यासाठीचे प्रस्ताव प्राप्त होत असतात. सदर प्रस्तावांची छाननी करीत असताना प्रस्तावासोबत जोडलेली कागदपत्रे ही अपूर्ण असल्याचे निदर्शनास येते. या संदर्भात महाविद्यालयांशी वारंवार कागदपत्रांची पूर्तता करण्यासंदर्भात कळवूनही अशा त्रुटींची पूर्तता महाविद्यालयांकडून वेळेत होत नाही, त्यामुळे सदर प्रस्तावांवर कार्यवाही करण्यास अडचणी येत असल्याने सदर प्रस्ताव प्रलंबित राहतात. त्याचप्रमाणे काही अध्यापक हे शैक्षणिक अर्हता धारण करीत नसतानाही अशा अध्यापकांची नेमणूक केल्याचे दिसून येते. अशा अध्यापकांच्या मान्यता नाकारल्याचे कळविल्यानंतर या संदर्भात माहिती अधिकारांतर्गत अर्ज, न्यायालयीन प्रकरणे व इतर तक्रारींची संख्या दिवसेदिवस वाढत आहे.

हे सर्व टाळण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / परिसंस्थेकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर प्रथम मान्यता (Provisional Approval) व अंतिम मान्यता (Final Approval) पध्दत अवलंबण्यात येणाऱ्या नवीन प्रक्रिया आणि त्या अनुषंगाने संगणक प्रणालीमध्ये योग्य तो बदल करण्यात आलेला असून सदर नवीन पध्दती अंमलात आणण्यापूर्वी सर्व संलग्नित महाविद्यालयातील संबंधितांना नवीन पद्धती अवगत करणे आवश्यक असल्याने खालील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार जिल्हानिहाय **ऑनलाईन** सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक | ऑनलाईन सभेची वेळ |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर व नाशिक | १०/६/२०२३ | सकाळी ११.३० |
| २ | पुणे जिल्हा | १०/६/२०२३ | दुपारी ३.३० |

सर्व संबंधिताना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, उक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार संबंधित महाविद्यालयातील / परिसंस्थेतील प्राचार्य / संचालक / प्रबंधक / कार्यालयीन अधिक्षक / मुख्य लिपिक किंवा संबंधित काम पाहणारा सेवक इत्यादींपैकी दोन प्रतिनिधींनी सदर ऑनलाईन सभेत सहभागी व्हावे.

यासंदर्भातील ऑनलाईन सभेची लिंक आपल्या महाविद्यालयाच्या पनकोडवर ई–मेलद्वारे पाठविण्यात येईल.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
जा. क्र. सीसीओ /९६४० )
दिनांक: ०७ जून, २०२३ )

7/6/2023
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत :

मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था,